# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १९/०९/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत वाढोणा शिवार जांब नदीचे येथे दि. १८/०९/२०२२ चे ०८.३० वा. सुमारास अनोळखी ईसम (पुरूष) वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष असलेला याचे प्रेत अंगावर कपडे नसलेल्या अवस्थेत कुजलेले दिसून आले. प्रेताची दुर्गंधी सुटलेली होती सदर प्रेत हे जांब नदीचे पाण्याचे प्रवाहात वाहत येवून नदीतील बंधाऱ्याला अडकलेल्या मोठया खोडाला अडकलेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुरेश अर्जुन पडोलिया, वय ५२ वर्ष, रा. वाढोणा ता काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक अविनाश बहेकर मो नं. ८३०८४०५३७३ हे करीत आहे.

२) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत १४ कि. मी अंतरावरील देवाळा काचुरवाही शिवार येथे दि. १८/०९/२०२२ चे ११.०० वा. सुमारास **रमेश गुलाब चरडे (मृतक), वय ५२ वर्ष रा. काचुरवाही ता. रामटेक** हे स्वताचे शेतात धानाचे पिकावर किटक नाशक औषधांची फवारणी करीत असतांना अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचारा करीता सरकारी दवाखाना रामटेक येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिनेश श्रीराम चरडे, वय ४१ वर्ष रा. काचुरवाही ता. रामटेक यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार सुरेश धुर्वे मो.न. ९९२२९३५८७८ हे करीत आहे.

३) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत १४ कि. मी अंतरावरील देवाळा काचुरवाही शिवार येथे दि. ०७/०९/२०२२ चे १२.०० वा. सुमारास **सचीन हरीचंद्र वाघे(मृतक) वय ३३ व ी रा मांडवी ता कळमेश्वर जिल्हा नागपूर** याने घरगुती वाद विवादचा कारणावरून जास्त प्रमाणात दारू पिउन दारूच्या नशेत स्वताचे घरी ठेवलेले किटक नाशक औषधी प्राशन केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचाराकामी प्रथम सरकारी दवाखाना मोहपा व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे दि ०७/०९/२०२२ रोजी भरती केले असता उपचारा दरम्याण त्याचा मृत्यु झाला. मृतकाचे मर्ग चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल करून चौकशीत ठेवण्यात आला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार प्रकाश नांदुरकर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रकाश नांदुरकर मो.नं. ८६०५३८१५९० हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

**पो.स्टे. काटोल :—** अंतर्गत ०२ कि.मी अंतरावरील पेठ बुधवार काटोल येथे दिनांक १९/०९/२२ चे १२.०० वा. दरम्यान फिर्यादीचा भाउ नामे— **राहुल अशोकराव हजारे (मृतक), वय ३० वर्ष, रा. पेठ बुधवार काटोल** याने अज्ञात कारणातुन आपले राहते घरी सिलींग फॅनला गळयाला दुपट्टा बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— विशाल अशोकराव हजारे, वय २८ वर्ष, रा. पेठ बुधवार काटोल यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास मपोहवा पंचफुला मोरे मो.नं. ९०४९६०७११५ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**